## परिपत्रक क्रमांक २९३ दिनांक १५/६/१९९८

**विषय :- कार्यालयांत आवक होणारे टपाल तसेच मा. उच्च न्यायालय तथा अन्य जिल्हा सत्र न्यायालयाकडून प्राप्त होणारे टपाल.**

१/- मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० तरतूदी अन्वये न्यायिक प्रकरणामध्ये या संघटनेतील वेगवेगळया जिल्हयातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाविरुध्द पक्षकारांनी मा. उच्च न्यायालय, तथा अन्य जिल्हा/सत्र न्यायालय यांचेकडे दाखल केलेले रिअ याचिका/दावा अपिल/किरकोळ/अर्ज चॅरिटी अर्ज व तसेच विशिष्ट मुदतीत दिलेल्या न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता/कारवाई बाबतच्या नोटीसा/समन्स वगैरे बाबतचे टपाल तवरित सहायक धर्मादाय आयुक्त (विधी) यांचेसमोर ठेवले जात नाही, असे निदर्शनास आले आहे. तेव्हा विधी शाखेचे सहायक धर्मादाय आयुक्त, यांचेपुढे सदर टपाल कार्यवाहीसाठी ज्या दिवशी अपाल प्राप्त झाले, त्याचदिवशी ठेवण्यांत यावे व तयावरील पुढील योग्य ती कारवाई/कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी सहायक धर्मादाय आयुक्त (विधी ) यांची राहील.

२/- सबब, कार्यालयांत प्राप्त होणारे टपाल संबंधित शाखेच्या अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी तात्काळ दिले जात नाही. त्यामुळे त्यावर कार्यवाही करण्यास दिरंगाई होते. म्हणून या परिपत्रकाव्दारे संबंधित आवक/जावक लिपिकांस असे निदेश देण्यांत येतात की, त्यांनी आलेले आदेश/नोटीस तथा अपाल इत्यादी त्याच दिवशी आवक नोंदवहीमध्ये नोंद करुन संबंधित अधिकाऱ्याचे ताब्यात देण्यांत यावे. सदरचाी आवक नोंदणीची कार्यवाही त्याच दिवशी पूर्ण केली आहे किंवा नाही याची तपासणी अधिक्षक (आस्थापना) यांनी स्वतः दररोज करावी व प्रत्येक आठवडयाच्या अखेरच्या दिवशी संपूर्ण टपाल वितरीत झाल्याबाबतचा अहवाल आवक/जावक नोंदवहीसह लेखा संचालक यांचेकउे सादर करावा.

३/- सदर परिपत्रकांची नोंद संबंधित आवक/जावक लिपिकांनी घ्यावी.

४/- वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास व टपाल प्राप्त झालेल्याच दिवशी आवक/जावक नोंदवहीत नोंद न झाल्यास तयाबाबतच्या दिरंगाईबाबत त्यांना जबाबदार धरण्यांत येईल व त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यांत येईल.

दिनांक :- १२ जून, १९९८.

(यू.डी.मालवणकर),
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.